राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून राज्यातील १० जिल्ह्यात स्टेमी प्रोजेक्ट राबविण्याकरीता आवश्यक बाबींची पूर्तता करण्याकरीता बाह्य संस्था नियुक्तीच्या निविदा प्रक्रियेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०५१९/प्र.क्र.३३२/आरोग्य-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : १६ जुलै, २०१९.

वाचा :-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/न.क्र.३७९-१/ STEMI Project/ECG Reading/प्र.मा.प्रस्ताव/६७९-६८०/२०१९, दिनांक २४ मे, २०१९.

२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दिनांक १० मे, २०१९ व २३ मे, २०१९ रोजीची मान्य टिप्पणी.

प्रस्तावना:-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून राज्यातील १० जिल्ह्यात स्टेमी प्रोजेक्ट राबविण्याकरीता आवश्यक बाबींची पूर्तता करण्याकरीता बाह्य संस्था नियुक्ती निविदा प्रक्रियेस अंदाजित रक्कम रु.२०७.०० लक्ष इतक्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून राज्यातील १० जिल्ह्यात (पुणे, ठाणे/पालघर, नागपूर, अमरावती, नांदेड, औरंगाबाद, सोलापूर, नाशिक, चंद्रपूर व वर्धा) स्टेमी प्रोजेक्ट राबविण्याकरीता आवश्यक बाबींची पूर्तता करण्याकरीता बाह्य संस्था नियुक्तीच्या अंदाजित रक्कम रु.२०७.०० लक्ष रकमेच्या निविदा प्रक्रियेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांनी शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर

प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबत लेखाशिर्षनिहाय अनुदान व प्रस्तावाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. :-

अनुदानाचा व प्रस्तावाचा तपशिल

Sr. no	FMR Code	Name of Head	Approved Budget in PIP in 2019-20 (In Lakhs)	Procurement Proposal (In Lakhs)
1	PIP 2019-20 FMR Code 18.16	ST Elevation in Myocardial Infraction (STEMI) Project- Hub & Spoke Model STEMI Care	207.00 Lakhs Approved 1) EGC Machine @ Rs.1.20 Lakhs for 110 SPOKES = Rs.132.00 Lakhs 2) ECG Consultation to the Third Party Agencies @ Rs.60/- per ECG interpretation = Rs.75.00 Lakhs **यaप्रमाणे एकूण** रु.207.00 Lakhs	STEMI Project- HUB & SPOKE Model Empanelment of Third party Agency for time bound Interpretation of ECG as per RFP Project Amt =207.00 Lakhs Approx.

स्टेमी प्रोजेक्टच्या अंमलबजावणीसाठी बाह्य संस्थेच्या सहाय्याने (Agency) खालील सेवा उपलब्ध करुन घेण्यात यावी. तसेच निविदा दस्तऐवजातील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी:-

- SPOKE असलेल्या रुग्णालयात ईसीजी काढण्यासाठी ईसीजी मशीन देणे.
- विशेषतज्ञाच्या सहाय्याने ईसीजीचे Reading Diagnosis & brief line management केवळ १० मिनिटात करुन तसेच SPOKE यांना कळविण्यात येईल.
- सदर ईसीजीचे Reading करण्यासाठी Software तयार करणे व Report Register ई-मेलवर पाठविण्यात येईल.
- **<u>या व्यतिरिक्त एजन्सीद्वारे खालील नमूद केलेल्या सेवा विनामुल्य देण्यात येतील.</u>**
  - सदर प्रस्तावित कामासाठी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या निविदा दस्तऐवजामध्ये नमूद केल्यानूसार एजन्सीने SPOKE अंतर्गत प्रस्तावित असणाऱ्या १० जिल्ह्यांमध्ये जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय याठिकाणी ECG Machine with Cloud Connectivity उपलब्ध करुन देऊन मशीने चे Installation करुन देण्यात येईल.
  - रुग्णाचे ईसीजी काढल्यानंतर रिपोर्ट (निदान व संक्षिप्त उपचार आराखडा) Mobile Application व ई-मेलद्वारे SPOKE व जिल्ह्यातील HUB कडे १० मिनिटांत पाठविण्यात येईल.
  - ईसीजी मशीन वापरण्याबाबत सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. Mobile Application चा वापर करण्याबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात येईल.
  - ईसीजी मशीनचा पुरवठा व त्यासोबत असणाऱ्या इतर साहित्य उपकरणांची देखभाल, दुरुस्ती व Software Maintanance एजन्सीमार्फत करण्यात येईल.

वरील तपशिल विचारात घेता सदरची प्रशासकीय मान्यता पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) सदर NPCDCS कार्यक्रमातील STEMI Project अंतर्गत बाह्य संस्था नियुक्त करण्याच्या बाबीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू बाबीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे GEM Portal, इतर राज्यांचे दरकरार, National Pharmaceutical Pricing Authority (NPPA) यांच्याकडील उपलब्ध असलेल्या न्युनत्तम दर विचारात घेण्यात यावेत. तसेच हाफकिन संस्थेतील सदर बाबींची खरेदी केली जात असल्यास अथवा झालेली असल्यास निविदेत प्राप्त झालेले न्युनत्तम दर विचारात घेऊन त्या दरांना अंदाजित दर म्हणून गृहित धरण्यात यावे व त्यानूसार निविदेकरीता मागणी नोंदवितांना औषधी, औषधी साहित्य व उपकरणांच्या संदर्भात अंदाजित दर म्हणून नोंदविण्यात यावेत व खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत FMR Code १८.१६ ST Elevation in Myocardial Infraction (STEMI) Project- Hub & Spoke Model STEMI care या लेखाशिर्षांतर्गत रु.२०७.०० लक्ष इतका निधी मंजुर झालेला आहे. सदर प्राप्त अनुदानातील रक्कम रु.७५.०० लक्ष ECG Consultation साठी व उर्वरित रु.१३२.०० लक्ष या रकमेस आवर्ती खर्च म्हणून कार्यकारी समितीची (EC) मान्यता घेण्यात यावी व त्यातून रु.१३२.०० लक्ष रक्कम Third Party Agency ECG Consultation साठी वापरण्यात यावी. याप्रमाणे सदर प्रोजेक्टसाठी मंजुर असलेल्या रु.२०७.०० लक्ष इतक्या अनुदानातून सदरचा खर्च भागविण्यात यावा. तसेच सदर खर्च मंजुर अनुदानाच्या विहित मर्यादेतच करण्यात यावा. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी - २०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201906201054288517 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.07.16 11:23:05 +05'30'

(ज. स. तडवी)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)